खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

(सुवर्णमहोत्सवी वर्ष)

प्रसिद्धी विभाग

शैक्षणिक वर्ष : २०२६ -२०२७

मराठी विभाग : तृतीय वर्ष कला - विद्यापीठस्तरीय अभ्यासक्रम कार्यशाळा

पुढारी

वैद्यकीय व्यवस्थेला उत्तरदायी बनवणारा कायदा व्हावा : औटी

बेल्हे : पुढारी वृत्तसेवा

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात चर्चेसाठी आलेले "महाराष्ट्र वैद्यकीय आस्थापना (नियमन) विधेयक" हे केवळ रुग्णालयांची नोंदणी करणारे कायदेपुस्तक ठरू नये. ते रुग्णांच्या घटनात्मक अधिकारांचे संरक्षण करणारे, ग्राहकांना न्याय देणारे आणि वैद्यकीय व्यवस्थेला उत्तरदायी बनविणारे असावे, अशी मत अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे मध्य महाराष्ट्र प्रांताध्यक्ष बाळासाहेब सीताराम औटी यांनी व्यक्त केले.

सात दशकांहून अधिक काळ अस्तित्वात असलेल्या जुन्या कायद्याऐवजी नवीन कायदा आणण्याचा निर्णय स्वागतार्ह असला तरी सध्याच्या विधेयकात रुग्णांच्या मूलभूत हक्कांना पुरेसे संरक्षण नाही. हा कायदा केवळ परवानग्या, नोंदणी आणि नियंत्रणापुरता मर्यादित राहिल्यास लाखो रुग्णांच्या न्यायाची अपेक्षा अपूर्ण राहील.

प्रत्येक रुग्णाला सन्मानाने उपचार, आजाराविषयी संपूर्ण माहिती, दुसऱ्या तज्ज्ञाचे मत, वैद्यकीय नोंदी, तपशीलवार बिल, गोपनीयता आणि प्रभावी तक्रार निवारणाचा कायदेशीर अधिकार मिळालाच पाहिजे, अशी ग्राहक पंचायतीची भूमिका असल्याचे औटी यांनी सांगितले.

वैद्यकीय सेवांमधील वाढती आर्थिक लूट थांबविण्यासाठी प्रत्येक रुग्णालयाने उपचारांचे दरपत्रक सार्वजनिकपणे प्रदर्शित करणे बंधनकारक करावे. उपचार सुरू करण्यापूर्वी रुग्णाला अंदाजे खर्च लेखी देणे सक्तीचे करावे आणि मनमानी शुल्कवाढीवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र शुल्क नियमन यंत्रणा निर्माण करावी, अशी मागणी औटी यांनी केली.

मराठी अभ्यासक्रम कौशल्याधारित असावा

- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मानव्यविद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ. प्रभाकर देसाई यांचे प्रतिपादन

राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा

नवीन शैक्षणिक धोरणामुळे अभ्यासक्रमाचे स्वरूप अधिक लवचिक आणि सर्वव्यापक झाले आहे. या पार्श्वभूमीवर मराठी अभ्यास मंडळाने अभ्यासक्रम तयार करताना स्थानिक गरजांचा विचार करून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ज्ञान, कौशल्य आणि कृतीधारित अभ्यासक्रमाची रचना करावी, असे आवाहन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मानव्यविद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ. प्रभाकर देसाई यांनी केले.

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत आयोजित तृतीय वर्ष मराठी अभ्यासक्रमाच्या एकदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी डॉ. देसाई बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील होते.

राजगुरू महाविद्यालयात आयोजित तृतीय वर्ष मराठी अभ्यासक्रम कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी मान्यवर उपस्थित होते.

या वेळी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. संदीप सांगळे, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. शिल्पा जगताप, डॉ. पायल ओसवाल आणि उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे उपस्थित होते.

या कार्यशाळेत पुणे, अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यांतील ११० मराठी विषयाच्या प्राध्यापकांनी सहभाग घेतला. प्राध्यापकांनी सविस्तर चर्चा करून अभ्यासक्रम अंतिम करण्याचे आवाहन त्यांनी केले. डॉ. सुधाकर शेलार, डॉ. प्रमोद आंबेकर, डॉ. सुरेश जाधव आणि डॉ. प्रकाश शेवाळे यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख डॉ. संजय शिंदे यांनी केले, तर सूत्रसंचालन डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी केले.

My Pune Gramin Edition
Jul 06, 2026 Page No. 5
Powered by: erelego.com

केसरी

किरण खुडे (पत्रकार)

ज्ञान, कौशल्य व कृतीधारित अभ्यासक्रम असावा : डॉ. प्रभाकर देसाई

राजगुरू महाविद्यालयात अभ्यासक्रम कार्यशाळा उत्साहात

राजगुरूनगर, (वार्ताहर) : नवीन शैक्षणिक धोरणामध्ये अभ्यासक्रमाचे स्वरूप लवचिक व सर्वव्यापक झाले आहे. या पार्श्वभूमीवर मराठी अभ्यास मंडळाने नेमकेपणाने अभ्यासक्रम तयार करताना काही प्रमाणात स्थानिकीकरण करावे आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ज्ञान, कौशल्य व कृतीधारित अभ्यासक्रम तयार करावा असे आवाहन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील मानव्यविद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ. प्रभाकर देसाई यांनी केले. येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालय आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत आयोजित तृतीय वर्ष अभ्यासक्रम एकदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टेपाटील होते. या प्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. संदीप सांगळे, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. शिल्पा जगताप, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे उपस्थित होते.

अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. संदीप सांगळे यांनी तृतीय वर्ष मराठी विषयाचा अभ्यासक्रम रोजगाराभिमुख, व्यावहारिक, साहित्य, भाषा यांची सांगड घालून तयार केला असून प्राध्यापकांना सविस्तर चर्चा करून अभ्यासक्रम अंतिम करण्याचे आवाहन केले.

संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टेपाटील यांनी बदलत्या समकालीन गरजांची पूर्ती करणारा अभ्यासक्रम तयार करून विद्यार्थ्यांना सर्वार्थाने सक्षम करावे, असे मराठी अभ्यास मंडळाला आवाहन केले.

प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील मराठी विषयाच्या सर्व प्राध्यापकांचे स्वागत केले.

मराठी अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. सुधाकर शेलार, डॉ. प्रमोद आंबेकर, डॉ. सुरेश जाधव, डॉ. प्रकाश शेवाळे यांनी नवीन शैक्षणिक धोरणानुसार तृतीय वर्ष मराठी विषयाच्या अभ्यासक्रमाची रचना, अध्यापन पद्धती व मूल्यमापन प्रक्रियेत झालेले बदल, श्रेयांक पद्धती याबद्दल माहिती दिली. या कार्यशाळेत पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्ह्यातील मराठी विषयाच्या ११० प्राध्यापकांनी सहभाग घेतला. कार्यशाळेचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे यांनी केले.

पुण्य नगरी

ज्ञान, कौशल्य व कृतीधारित अभ्यासक्रम असावा : डॉ. देसाई

राजगुरुनगर : प्रतिनिधी

नवीन शैक्षणिक धोरणामध्ये अभ्यासक्रमाचे स्वरूप लवचिक व सर्वव्यापक झाले आहे. या पार्श्वभूमीवर मराठी अभ्यास मंडळाने नेमकेपणाने अभ्यासक्रम तयार करताना काही प्रमाणात स्थानिकीकरण करावे आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ज्ञान, कौशल्य व कृतीधारित अभ्यासक्रम तयार करावा, असे आवाहन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील मानव्यविद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ. प्रभाकर देसाई यांनी केले.

ते खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे हुतात्मा राजगुरू महाविद्यालय आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत आयोजित तृतीय वर्ष अभ्यासक्रम एकदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील होते. या प्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. संदीप सांगळे, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. शिल्पा जगताप, डॉ. पायल ओसवाल, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे उपस्थित होते.

अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. संदीप सांगळे यांनी तृतीय वर्ष मराठी विषयाचा अभ्यासक्रम रोजगाराभिमुख, व्यावहारिक, साहित्य, भाषा यांची सांगड घालून तयार केला असून प्राध्यापकांना सविस्तर चर्चा करून अभ्यासक्रम अंतिम करण्याचे आवाहन केले.

संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी बदलत्या समकालीन गरजांची पूर्ती करणारा अभ्यासक्रम तयार करून विद्यार्थ्यांना सर्वार्थाने सक्षम करावे असे मराठी अभ्यास मंडळाला आवाहन केले.

प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील मराठी विषयाच्या सर्व प्राध्यापकांचे स्वागत केले.

Pimpri Chinchwad Edition
Jul 06, 2026 Page No. 02
Powered by: erelego.com

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख